**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ९व्या स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कारांचं वितरण, राज्यातल्या नवी मुंबई, मीरा-भाईंदर आणि कराडला पुरस्कार

- विधान भवन परिसरात आमदारांना मारहाण

- राज्यात कायदा सुव्यवस्था बिघडली असून गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिलेला नसल्याची विधान परिषदेत विरोधी पक्षनेत्यांची टीका

**आणि**

- नाशिक इथं कार अपघातात ७ जणांचा मृत्यू, २ जण गंभीर जखमी

**<><><><>**

प्राचीन काळापासून स्वच्छता हा देशाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक चेतनेचा भाग असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत ९व्या स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. स्वच्छ भारत अभियानांतर्गत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रयत्नांचं कौतुक करताना राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की स्वच्छ सर्वेक्षण हा एक यशस्वी उपक्रम ठरला आहे.

स्वच्छ भारत मिशन - शहरी अंतर्गत स्वच्छतेसाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमाअंतर्गत यावर्षी सुपर स्वच्छ लीग शहरं आणि लोकसंख्येच्या आधारे पाच श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये, इंदूरने सलग आठव्या वर्षी भारतातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून आपला किताब कायम ठेवला. केंद्र सरकारच्या वार्षिक स्वच्छता सर्वेक्षणात सुरत दुसऱ्या क्रमांकावर आहे, तर नवी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर आहे. तसंच लोकसंख्येच्या आधारे विभागण्यात आलेल्या ५ श्रेणींमध्ये राज्यातल्या मीरा- भाईंदर, कराड या शहरांना सुपर स्वच्छ शहर पुरस्कार मिळाला आहे. या कार्यक्रमादरम्यान, विविध श्रेणींमध्ये एकूण ७८ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**<><><><>**

आज विधानभवनाच्या प्रांगणात आमदारांना मारहाण झाल्याचे मुद्दे दोन्ही सभागृहांमधे पुढं आले. आपल्याला मारण्यासाठी काही लोकांना बाहेरून आणलं होतं असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत केला. या सर्व प्रकरणाची चौकशी केली जाईल आणि दोषींवर कारवाई करण्यात येईल अशी ग्वाही अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली. तर, आमदार गोपीचंद पडळकर यांना विधानभवनाच्या लॉबी मध्ये धक्काबुक्की करण्यात आली, त्याबाबत कारवाई करण्याची मागणी संजय उपाध्याय यांनी सभागृहात केली, ती तातडीनं करण्यात येईल अशी ग्वाही अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली. या प्रकरणी सना मलिक, रोहित पवार, मंत्री आशिष शेलार यांनी देखील चिंता व्यक्त केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार नितीन देशमुख यांना विधानभवन परिसरात मारहाण झाल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी विधानसभेत दिली. याची माहिती घेऊन त्वरित कारवाई करावी असे निर्देश विधानसभा अध्यक्षांनी सरकारला दिले.

याबाबत बातमीदारांसी बोलताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले…

**- - होल्ड - बाईट - -**

**- <><><><>**

राज्यात कायदा सुव्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झालेली असून गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिलेला नाही, अशी टीका विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव मांडताना केली. या वर्षी ३१ मेपर्यंत राज्यात १ लाख ६० हजाराहून जास्त गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यात बलात्काराचे ३ हजार ५०६, घरगुती हिंसाचाराचे सुमारे ४ हजार, तर खुनाचे ९२४ गुन्हे घडल्याचं सांगून, यावर उत्तर कोण देणार, असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला.

वाढती सायबर गुन्हेगारी, अपुरं पोलीस दल, रखडलेली भर्ती, यातलं महिलांचं कमी असलेलं प्रमाण, अंमली पदार्थ, हुक्का, गुटखा इत्यादींचा वाढत असलेला विळखा, इत्यादी मुद्द्यांकडे त्यांनी लक्ष वेधलं. वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या, सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिसांच्या मारहाणीमुळे झालेला मृत्यू इत्यादी प्रकरणं त्यांनी अधोरेखित केली. या आणि इतरही अनेक प्रकरणांमध्ये सत्ताधारी पक्षाच्या प्रतिनिधींचा हात असल्याचा आरोप त्यांनी केला. राज्यातल्या सगळ्या

महानगरपालिकांमध्ये अनागोंदी कारभार, गैरव्यवहार होत असल्याचा आरोपही दानवे यांनी केला. सरकारनं नव्या मद्य धोरणांतर्गत ३२८ परवाने दिले, महाराष्ट्राला मद्यराष्ट्र करायचं आहे का, असा सवाल त्यांनी विचारला. राज्यातली कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती इतकी बिघडलेली असताना सरकार फक्त जाहिराती आणि भाषणांमध्येच आहे, अशी टीका त्यांनी केली.

**<><><><>**

पंढरपूर इथला सुधारित तीर्थक्षेत्र आराखडा लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात येतील असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सांगितलं. सदस्य हेमंत रासने यांनी यासंदर्भात लक्षवेधी उपस्थित केली होती. या आराखड्याअंतर्गत पंढरपुरातल्या सफाई कामगारांना ६०० चौरस फुटांची घरं देण्यात येणार असून, यासाठी सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले जातील असंही पवार यांनी सांगितलं. राज्य उत्पादन शुल्क विभागात सध्या सुरु असणाऱ्या भरती प्रक्रियेत बदल करण्याबाबत विधी आणि न्याय विभागाचा अभिप्राय घेऊन निर्णय घेण्यात येईल, असं पवार यांनी सदनात सांगितलं. दुय्यम निरीक्षकांची पदोन्नतीद्वारे होणारी पुढील भरती शंभर टक्के जवानांमधून केली जाईल, असं ते म्हणाले.

मुंबईला तोडण्याचं नाही तर जगाशी जोडण्याचं काम सरकार करत आहे. आगामी काळात मुंबईचा जीडीपी दुप्पट होईल, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. ते आज विधानसभेत २९३ अंतर्गत झालेल्या चर्चेला उत्तर देत होते. मुंबईत गेल्या अडीच वर्षांत अनेक विकासकामं झाली असून पुढच्या काही वर्षांत मुंबई खड्डेमुक्त होईल असं उपमुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><>**

एक जानेवारी २०२५पूर्वीच्या १ हजार चौरस फुटांवरील जमिनींना कायदेशीर मान्यता मिळणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिली. राज्यात कृत्रिम वाळूच्या उत्पादनाला चालना देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात ५० नवीन क्रशर उभारण्याचे नियोजन आहे. एम-सँडला उद्योगाचा दर्जा देण्यात आला असून, यामुळे उद्योगांना सर्व सुविधा उपलब्ध होतील. रॉयल्टी ४०० रुपये प्रति

ब्रासवरून २०० रुपये करण्यात आली आहे. उद्योगमंत्र्यांच्या सहकार्याने जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत बैठका घ्याव्यात, असं आवाहन बावनकुळे यांनी केलं.

<><><>

नाशिक जिल्ह्यात एक कार आणि मोटारसायकलमध्ये धडक होऊन झालेल्या अपघातात ३ महिला आणि एका बालकासह ७ जणांचा मृत्यू झाला. तर २ जण गंभीर जखमी झाले आहेत. नाशिक- दिंडोरी रस्त्यावर काल रात्री अल्टो गाडी दुचाकीला धडकून दोन्ही वाहनं रस्त्यालगत असलेल्या एका लहान नाल्यात उलटली, अशी माहिती पोलिसांनी दिली. जखमींना उपचारासाठी नाशिक जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

<><><>

दहीहंडी पथकातल्या गोविंदांना शासनाकडून मिळणाऱ्या विमाकवचात वाढ करावी या मागणीसाठी  दहीहंडी समन्वय समितीने मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांची आज भेट घेतली. राज्य शासनाने ७५ हजार गोविंदांसाठी विमा कवच दिले आहे परंतू ही संख्या दीड लाखांपर्यंत वाढवावी अशी मागणी आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखालील या समितीनं मुख्यमंत्र्यांकडे केली. याबाबत क्रीडा विभागाला मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले.

<><><>

फ्रीस्टाईल ग्रँड स्लॅम बुद्धिबळ स्पर्धेत भारताचा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद याने प्रथम मानांकित मॅग्नस कार्लसनविरुद्ध सामना जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. लास वेगास इथं सुरु असलेल्या या स्पर्धेत प्रज्ञानंदने खेळाच्या चौथ्या फेरीत केवळ एकोणचाळीस चालींमध्ये कार्लसनवर मात केली.

<><><>

धुळ्यातील सुप्रसिद्ध तबलावादक खान्देश भूषण मधुकरराव गुरव यांचं आज सकाळी वृद्धापकाळानं निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. १९७३ साली आकाशवाणीची परीक्षा पास झालेल्या गुरव यांनी विविध कार्यक्रमात तबल्यावर साथ केली होती.

<><><>

धार्मिक कार्यासाठी प्राण्यांचा वापर करण्याच्या माणसाच्या हक्कापेक्षा चांगल्या दर्जाचं आयुष्य जगण्याच्या प्राण्यांच्या हक्काला प्राधान्य दिलं पाहिजे अशी टिप्पणी करत मुंबई उच्च न्यायालयाने कोल्हापूरच्या हत्तीणीला पुनर्वसन केंद्रात पाठवण्याचा आदेश दिला.

कोल्हापूरच्या जैन विश्वस्त मंडळाकडे गेल्या तीन दशकांपासून महादेवी उर्फ माधुरी ही हत्तीण आहे.  मंडळाने तेलंगणा राज्य वफ्क मंडळाला मोहर्रमच्या मिरवणुकीसाठी ही हत्तीण भाडेकराराने दिली होती. यासाठी वनविभागाची परवानगी न घेता तसंच हत्तिणीच्या प्रकृती अस्वास्थ्याकडे दुर्लक्ष करुन केलेल्या या कृत्याला आक्षेप घेत पेटाने न्यायालयात दाद मागितली होती.

<><><><>

येत्या चोवीस तासात कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडेल तर राज्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

//<><><><>//